# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

**विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २३.०१.२०१३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत**

दिनांक २३.०१.२०१३ रोजी दुपारी ०३.०० वाजता मा. कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मधुकर गायकवाड | : | मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा अध्यक्ष |
| २. | श्रीमती सरोज देशपांडे, कल्याण आयुक्त (प्रशासकीय), मुंबई | : | शासन प्रतिनिधी |
| ३. | श्री. अनिल ढवळे | : | मालक प्रतिनिधी |
| ४. | श्री. रमेश सारडा | : | मालक प्रतिनिधी |
| ५ | श्री. प्रकाश देवतळे | : | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. केदार काळे | : | मालक प्रतिनिधी |
| ७ | श्री. मुनवर शेख | : | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. राजेश फुले | : | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री. दादाराव डोंगरे | : | कामगार प्रतिनिधी |
| १०. | श्रीमती राधिका गायकवाड | : | कामगार प्रतिनिधी |

सर्वप्रथम मा.अध्यक्षांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

**विषय क्र. १ : मागील बैठकीच्या इतिवृत्तास मंजुरी देणे.**

सुरुवातीस मागील दि. ६.११.२०१२ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तांताचे वाचन करण्यात आले. त्यास अनुसरुन श्री.फुले यांनी विचारणा केल्यावरुन मा.अध्यक्षांनी स्पष्ट केले की, मा.सदस्यांच्या भत्त्याचा ठराव ज्या दिवशी पारीत झाला असेल त्या दिवसापासूनच भत्ता

लागू होईल व सदरील भत्ता सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे बैठकीचा एक दिवस अगोदर, बैठकीचा दिवस आणि बैठकीच्यानंतरचा एक दिवस असा एकूण तीन दिवसांसाठीचा असेल. सदरील दि. १७.१०.२०१२ च्या इतिवृत्तांतात अशी सुधारणा दि. ६.११.२०१२ च्या इतिवृत्तांतात करण्यात आलेली असून ती सुधारणा दिनांक ६.११.२०१२ च्या इतिवृत्तांतात केलेली असल्याने या ६.११.२०१२ पासून लागू होईल. सदरच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे.

**विषय क्र. २ : कामगारांच्या व मालकांच्या नोंदणीच्या कार्यपध्दतीत सुलभता आणणे.**

मा.अध्यक्षांनी प्रतिपादन केले की, नोंदीत कामगारांची जी संख्या आहे, ती समाधानकारक नसल्याने या संख्येत वाढ होण्याची आवश्यकता आहे. आतापर्यंत सुमारे ९६,००० कामगार नोंदीत झालेले आहेत. त्याचप्रमाणे म.न.रे.गा. अंतर्गत काम करणा-या कामगारांनाही मंडळात नोंदणीसाठी समाविष्ट करुन घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. ज्या म.न.रे.गा.कामगारांनी वर्षभराच्या कालावधीमध्ये ९० दिवस काम केले असेल अशा कामगाराची नोंदणी झाल्यास साधारणत: नोंदीत कामगारांची संख्या १,९२,००० पर्यत यामुळे वाढेल व हे सर्व कामगार महाराष्ट्रातच स्थायिक असल्यामुळे त्याना लाभ देण्याची प्रक्रिया सुध्दा सुलभ पध्दतीने होईल. यासाठी जिल्हयाच्या जिल्हाधिकारी कार्यालयाचे सहकार्य घेणे अपेक्षित आहे व त्यामुळे कामाचा निपटारा लवकर होईल.

श्री. फुले यांनी विचारणा केली की, आपण प्रत्येक विभागाला रु. ५,००,०००/- नोंदणी वाढविणे व अनुषंगिक कामासाठी दिलेले आहेत, त्याचा काही परिणाम झाला आहे किंवा कसे यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की, सुरुवातीस नोंदीत कामगारांची संख्या सुमारे ४८,००० होती ती आता सुमारे ९६,००० एवढी झालेली आहे. यावर सदस्यांनी बांधकाम मंडळाच्या नोंदणीसाठी एक स्वतंत्र वेबसाईट असावी व त्यासाठी शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाची मदत घ्यावी असे सुचविले व हे काम करण्यासाठी लागणा-या कर्मचा-यांची नेमणूक माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या मदतीने करावी.

श्री.काळे, मालक प्रतिनिधी यांनी कामगार ज्या गतीने नोंदणीकृत हवेत, ते ह नसल्यामुळे कामगारांना स्मार्ट कार्ड देण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. या मा.अध्यक्षांनी यासाठी माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग केला तर नोंदणीमध्ये सुलभता आणता

येईल व बांधकाम कामगारांना स्मार्ट कार्ड देणे शक्य होईल असे सांगितले. त्याचप्रमाणे श्री.काळे यांनी जिल्हास्तरावर सर्व सदस्यांनी पाहणी करण्यासाठी जावून यावे असेही सांगितले.

श्री.डोंगरे यांनी म.न.रे.गा.कामगार हे रोजगार हमीचे काम करीत असल्यामुळे त्यांना या कायद्यांतर्गत फायदे देता येतील का ? याबाबत प्रश्न उपस्थित केला असता मा.अध्यक्षांनी रोजगार हमी योजनेखाली होणारी कामे ही बांधकामाच्या व्याख्येत येत असल्यामुळे त्यांना फायदा देता येईल असे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे श्री.डोंगरे यांनी खरा बांधकाम कामगार हा नाका कामगार असुन त्याची नोंदणी होणे आवश्यक असण्यावर जोर दिला व त्यासाठी मागे चर्चा झाल्यानुसार तेथे काम करणा-या कामगार संघटनेला अशा प्रकारच्या कामगाराच्या नोंदणीसाठी रु. ७५/- एवढी रक्कम द्यावी, त्यामुळे नोंदणी झपाटयाने होईल. याबाबत चर्चा झाली व सर्व सदस्यांनी अशा प्रकारे संघटनेस पैसे देण्यास विरोध दर्शविला.

सदस्यांनी कामगारांच्या नोंदणीबरोबर मालकाची नोंदणी होणे सुध्दा अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. यासाठी क्रेडाई, BIA यासारख्या मालकाच्या संघटनेची मदत घेतली गेली पाहिजे. तसेच विभागीय पातळीवर मालकांची बैठक व शिबीरे आयोजित केली पाहिजेत असे सुचविले. श्री. डोंगरे यांनी नोंदणीसाठी एक टास्कफोर्स नेमण्याबाबत सुचविले.

श्री.राजेश फुले यांनी मालकाकडे काम करणारा कामगार हा नोंदणीकृतच असावा म्हणजेच नोंदणी न झालेल्या कामगाराकडून काम करुन घेण्यास बंदी असावी असे प्रतिपादन केले. यावर मा.अध्यक्षांनी कायद्यात अशी तरतूद नसल्याचे स्पष्ट केले.

श्री.ढवळे व अन्य सर्व सदस्यांनी विभागीय पातळीवर मंडळ सदस्यांच्या उपस्थितीत बिल्डर्स असोसिएशनची बैठक घेवून असोसिएशने मालकांना विश्वासात घेवून त्यांना कामगारांच्या नोंदणीसाठी उत्तेजन देण्यात यावे व त्यांना नोंदणीबाबत जाणीव करुन देण्यात यावी असे सुचविले व याबाबत सर्व सदस्यांनी यास सहमती दर्शविली. याबाबत श्री.काळे यांनी नोंदणीसाठी मालकांच्या संस्थांना नोंदणीसंबंधी पत्र पाठवावे असे सुचविले.

**विषय क्र. ३ : लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या प्रक्रियेत गती आणणे.**

याबाबत चर्चा झाली. प्रथमत: श्री.डोंगरे यांनी सुचविले की, शैक्षणिक लाभ हा लवकरात लवकर दिला गेला पाहिजे, जेणेकरुन विद्यार्थ्यास त्याच वर्षात लाभ मिळाला पाहिजे.

श्री.फुले यांनी प्रसुती लाभ, अंत्यविधी सहाय्य हे लवकरात लवकर मिळत नाहीत. त्यामुळे पाहिजे तेव्हा त्याचा कामगारास उपयोग होत नाही अशी उदाहरणे देवून स्पष्ट केले. यासाठी विभागीय कार्यालयाकडे काही रक्कम ठेवली गेली पाहिजे म्हणजे विभागीय अधिकारी तेथल्या तेथे असा लाभ तात्काळ देवू शकेल.

मा.अध्यक्षांनी सदस्यांच्या असे निदर्शनास आणले की, लाभाबाबत जे वेळोवेळी ठराव झालेले आहेत, त्यात सुसूत्रता आणून त्याचे नियम तयार करुन अधिसूचना काढणे आवश्यक आहे. सदस्यांना केलेल्या नियमाचा कच्चा मसुदा देण्यात आलेला असून त्याबाबत त्यांनी त्यांचे विचार मांडावेत.

१. सर्व सदस्यांनी असे सांगितले की, नोंदणी झाल्यापासून कामगारास एक वर्ष पूर्ण झाल्यावरच लाभ देण्याची अट असू नये. कामगार नोंदीत होताच त्यास लाभ मिळाला पाहिजे.

२. इयत्ता १ली ते १०वी मधील नोंदीत लाभार्थी कामगाराच्या मुलास प्रत्येक महिन्यास रु.५०/- देण्याऐवजी ही रक्कम वार्षिक एकत्रित देण्यात यावी व ती वर्षाच्या सुरुवातीस देण्यात यावी.

३. वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणासाठी प्रतिवर्षी रु. ३५,०००/- देण्यात यावेत व तशी नियमात तरतूद करावी.

४. बांधकाम कामगाराच्या १२वी ते पदवीपर्यंत शिक्षण घेणा-यास विद्यार्थ्यास प्रतिवर्षी रु.१५,०००/- देण्यात यावेत.

५. गंभीर रोगाच्या व प्रमुख आजाराच्या उपचारासाठी रु. २५,०००/- देण्यात यावेत तसेच गंभीर रोग व आजार यांची यादी शासनाच्या संबंधित शासन निर्णयातून घेण्यात यावी.

६. नोंदीत लाभार्थी कामगाराचा घरी किंवा इतरत्र कुठेही मृत्यू झाल्यास त्याच्या वारसास अंत्यविधीसाठी रु. ५०००/- एवढी तातडीची मदत देण्यात यावी.

७. नोंदीत कामगाराचा कामावर असताना अपघाती मृत्यू झाल्यास त्याचे वारसास लाभाची रु. २,००,०००/- एवढी रक्कम देण्यात यावी. असा अर्ज करणा-या वारसाने

इतर वारसाच्या संमतीपत्रासह तहसिलदाराचे वारसा हक्क प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. वारसास याबाबत वाद असल्यास सक्षम प्राधिका-याकडून वारसा हक्क प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील अशी तरतूद करण्यात यावी.

८. घरबांधणी किंवा दुरुस्तीसाठी सहाय्य देण्याची तरतूद अधिनियमात नसल्यामुळे त्याबाबतीत घरकर्ज किंवा अग्रिम देण्याबाबतचा निर्णय घेता येईल असे ठरले.

तसेच तयार केलेल्या नियमाच्या कच्च्या मसुद्यात वर चर्चा केल्याप्रमाणे बदल करण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४ : नोंदणी प्रक्रिया वेगाने होण्यासाठी प्रत्येक विभाग व जिल्हा कार्यालयास इंटरनेट सुविधा देण्याबाबत.**

याबाबत सांगोपांग चर्चा होवून प्रत्येक जिल्हा कार्यालय व विभागीय कार्यालयास मासिक रु. १०००/- च्या मर्यादेपर्यंत इंटरनेट सुविधा देण्याबाबत मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली.

**मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय:**

श्री. डोंगरे यांनी दिलेल्या पत्रातील मुद्दयांबाबत मा.अध्यक्षांनी चर्चा करुन निराकरण करण्यात आले.

श्री. डोंगरे यांनी ऑडीट रिपोर्ट व वार्षिक अहवाल याबाबत विचारणा केल्यावरुन ऑडीट रिपोर्ट प्रत देण्यात येईल व वार्षिक अहवालाची सद्य:स्थिती अध्यक्षांनी सांगितली.

मंडळाच्या उपकराच्या रकमेचा हिशोब तसेच मंडळाचा उपकर भरणा-या कार्यालयाच्या मालकाच्या हिशोबाचा ताळमेळ व्यवस्थित लागत नसल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिल्यावरुन मा.अध्यक्षांनी उपकराची रक्कम परस्पर बॅकेत जमा न होता रकमेचा धनाकर्ष या कार्यालयास जमा होवून नंतर तो कार्यालयाद्वारे बॅकेत जमा केला जाणे अशा प्रकारची कार्यपध्दती अवलंबिल्यावरच सुस्पष्टता येईल असे सांगितले.

श्री. फुले यांनी कामगारांना प्लास्टीकच्या चटया देणे, ब्लॅकेट देणे व मच्छरदाण्या देण्यासाठी खरेदी करण्याबाबत सुचविले. यास सर्वांनी अनुमती दिली.

श्री.देवतळे यांनी मंडळाच्या जाहिरातीत सदस्यांची नावे असणे आवश्यक आहे असे सुचविले, श्री. ढवळे व श्री. काळे यांनी यास सहमती दर्शविली.

कामगारांच्या मुलांसाठी होस्टेल बांधण्याचा मुद्दा श्री. ढवळे यांनी उपस्थित केला. त्यास श्री. काळै, श्री.देवतळे, श्री. डोंगरे व श्री. फुले यांनी सहमती दर्शविली. मा.अध्यक्षांनी याबाबत अशा प्रकारचे होस्टेल देशात अन्यत्र कुठेही बांधलेले नाही व कामगार विभागास ते चालविण्याचा अनुभव नाही व यंत्रणाही नाही असे स्पष्ट केले. तथापि, यावर विचारविनिमय करण्याचे ठरले.

मंडळाच्या कल्याण निधीसाठी स्वतंत्र खाते उघडण्यास मंजुरी देण्यात आली.

मंडळात प्राप्त झालेल्या कल्याणकारी योजनांच्या सर्व अर्जाबाबत शहानिशा केली जावी यानुसार मंजुरी देण्यात आली.

मंडळाने दिलेल्या वृत्तपत्रातील जाहिराती तसेच एस.टी.महामंडळाच्या बसेसवरील जाहिराती तसेच राष्ट्रीय लघु उद्योग विकास महामंडळामार्फत द्यावयाच्या पत्र्यावरील जाहिरातीस व यापोटी होणा-या खर्चाबाबत चर्चा होवून मंडळाने मंजुरी प्रदान केली.

शेवटी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याण मंडळ**